| MHPU240015082021 | नियमित दिवाणी दावा क्र. २०८/२०२१<br>मल्हारी काळे वगैरे<br>वि.<br>जयश्री काळे वगैरे |
|---|---|

## निशाणी क्रमांक १६ वरील आदेश

०१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रतिवादींनी निशाणी क्र. १८ वर लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, दाव्याचे कामकाज चालु असताना वादींनी जाणिवपुर्वक मनाई अर्ज चालविलेला नाही. त्यामुळे त्यांना दुरुस्ती अर्जाप्रमाणे दुरुस्ती मागणेचा अधिकार नाही. वादी व प्रतिवादींचे मुळ पुरुष सितारा होते. त्यांना सखाराम, रामदास व आनंथा अशी मुले होती. सखाराम मयत असुन त्याला वादी हे वारस आहेत. रामदास हा मयत असुन प्रतिवादी क्र. २ हा त्यांचा वारस असुन प्रतिवादी क्र. १ ही त्याची पत्नी आहे. तसेच आनंथा हा मयत वारस असुन त्याची कायदेशीर वारस ही रंजना आनंथा काळे ही आहे. या सर्वांचे एकत्र हिंदु कुटुंब आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे जुने घर हे जवळपास ३५ ते ४० वर्षे जुने असुन ते मोडकळीस आलेले आहे. जुन्या घराच्या भिंतीना तडे गेलेले आहेत. घरावरील मंगलोरी कौले जागोजागी फुटलेली असल्याने पावसाळयात घर गळत असते. घर पक्के नसुन भेंडयापासून बनविलेले आहे. त्यामुळे जर जास्त जोराचा पाऊस झाल्यास जुने घर पडण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादींना नवीन घराची आवश्यकता होती.

त्यामुळे त्यांनी पाहुण्यांकडून हात ऊसणे पैसे घेवून व कर्ज प्रकरण करुन प्रतिवादी क्र. १ हा त्याचे गट क्रत्र् १३८३ पैकी मागील बाजुस त्याचे ताबे वहिवाटीत असलेल्या ०० हे १३ आर क्षेत्राचे आतच त्यांचे नवीन आर.सी.सी. घराचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. त्याने कोणतेही अतिक्रमण वादीचे क्षेत्रात केलेले नाही. वादीने केलेला अर्ज पुर्णपणे मोघम स्वरुपाचा असुन त्यामधून कोणताही बोध होत नाही. दावा दुरुस्तीची परवानगी दिल्यास दाव्याचे स्वरुपातच बदल होणार आहे. त्यामुळे मागितलेली दुरुस्ती फेटाळण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

**०३.** उभयपक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** उभयपक्षकारातर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, दावा निरंतर मनाईकरीता आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीत बांधकाम केल्याचे वादींनी अर्जात कथन करुन त्यासंबंधी प्रस्तावित दुरुस्ती मागितलेली आहे. तसे घर बांधल्याचे प्रतिवादींनी म्हणण्यामध्ये मान्य केलेले आहे. त्यामुळे वादींच्या कथनास पुष्टी मिळते. जरी, दाव्याचे स्वरुप प्रस्तावित दुरुस्तीने बदलणार असले तरीही, दावा मिळकतीचा तो बदल प्रस्तुत दावा प्रलंबित असताना झालेला आहे. दावा अद्याप प्राथमिक टप्प्यावर आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास आणखी दाव्यांची निर्मिती होण्यास टळणार असुन, उभयपक्षकारांदरम्यानचा वाद एकाच दाव्यामध्ये निकाली होणार आहे. या बाबींचा विचार करता, अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येतो –

अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.



Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.09.12 15:57:07 +0530

(श्री. अविनाश म. पाटील)

दिनांक:- १२.०९.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, घोडेगाव,

ता. आंबेगाव, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gaurav A. Bobade. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 12.09.2025. |
| Corrected on | : 12.09.2025. |
| Signed on | : 12.09.2025. |